# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## कामगार कल्याण व जनसंपर्क विभाग

संपर्क क्र. - ०२१७-२७३५२८० ई-मेल आय डी lwpro@solapurcorporation.org

# लोकशाही दिनाबाबत माहिती

### दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन

मा.महाराष्ट्र शासनाच्या आदेशाप्रमाणे सोलापूर महानगरपालिका पातळीवर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन म.न.पा.इंद्रभुवन सभागृहात सकाळी 10 ते 1 किंवा सुनावणी संपेपर्यंत यावेळेत संपन्न होतो.

या लोकशाही दिनात महापालिकाविषयी व संबंधित विषयावर तक्रारी अर्ज व त्यावर शासनाच्या विहित नमुन्याचे फॉर्म जोडून नियोजित लोकशाही दिनाच्या 15 दिवस अगोदर पालिकेच्या कामगार कल्याण व जनता संपर्क अधिकारी यांच्याकडे दोन प्रतित द्यावे लागते.

त्यांनतर या तक्रारी अर्जाचे त्या त्या संबंधित खातेचे अधिकारी 15 दिवसात त्या तक्रारीचे निरसन न केलेस त्या महिन्याच्या पहिल्या सोमवारी होणा-या लोकशाही दिनात तक्रारदार व अधिकारी यांच्या उपस्थितीत मा.आयुक्त सुनावणी घेऊन पुढील कार्यवाही केली जाते.

सोलापूर महानगरपालिका इंद्रभुवन सभागृहात मा. आयुक्त व सर्व खातेचे अधिकारी व संबंधित तक्रारदार यांच्या उपस्थितीत लोकशाही दिन दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी संपन्न होतो. तरी नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सोलपूर महानगरपालिके तर्फे करणेत येत आहे.